## वादपत्र निशाणी क्रमांक ०१ वर आदेश

(पारीत केलेला दिनांक **२८.०४.२०२३**)

**०१.** प्रतिवादी क्रमांक ०१ आणि प्रतिवादीतर्फे विधीज्ञ गैरहजर.

**०२.** प्रतिवादी क्रमांक ०१ हा विधीज्ञ **श्री. पी. एन. काळाते** यांच्यामार्फत दिनांक **१०.०३.२०२३** रोजी वकीलपत्र **नि.क्र.१६** अनुसार हजर झाला आहे. प्रतिवादीने मुदतीत **कैफियत** दाखल केली नाही किंवा मुदत अर्ज दाखल केला नाही.

**०३.** प्रतिवादीने **दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम ०१ सह वाचनीय क्रम ०५ नियम ०१** नुसार मुदतीत **कैफियत** दाखल केली नाही. म्हणून त्याच्याविरुध्द **दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम १०** नुसार दावा '**विना कैफियत**' चालवण्याचा आदेश पारीत करणे न्यायाचे होईल. म्हणून खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

०१. प्रतिवादी क्रमांक ०१ ने मुदतीत कैफियत दाखल केली नाही म्हणून त्याच्याविरुध्द **दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम १० नुसार** दावा **'विना कैफियत'** चालवण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SUBHASH LAXMAN PHULE
Date: 2023.04.28 18:00:12 +0530

**(श्री. सुभाष ल. फुले.)**
**सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,**
**औसा. जिल्हा लातूर.**

**दिनांक :– २८.०४.२०२३.**
**ठिकाण :– औसा.**